# अधिसूचना

## अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग

**मंत्रालय, मुंबई** - ४०० ०३२.

**दिनांक :- १९ जानेवारी, २०१८.**

महाराष्ट्र अन्नसुरक्षा
नियम ,२०१७.

क्रमांक :- न्यायप्र-२०१६/प्र.क्र.१७१/नापु-२२ महाराष्ट्र अन्नसुरक्षा नियम, २०१७ या प्रस्तावित नियमावरील हरकती किंवा सूचना, महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ च्या अधिसूचना (असाधारण क्रमांक २०२) द्वारे, दिनांक १५ जानेवारी, २०१८ पर्यंत मागविण्यात आल्या आहेत ;

ज्याअर्थी उक्त नियमांबाबतच्या हरकती किंवा सूचना सादर करण्याच्या दिनांकाची मुदत वाढविणे इष्ट आहे;

त्या अर्थी आता, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, (सन २०१३ चा २०) च्या कलम ४० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र अन्नसुरक्षा नियम, २०१७ या प्रस्तावित नियमांवरील हरकती किंवा सूचना सादर करण्याच्या दिनांकास, दिनांक ३१ जानेवारी, २०१८ मुदतवाढ देण्यात येत आहे.

उक्त मसुद्याबाबत, उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी कोणत्याही व्यक्तींकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्म राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२ या पत्यावर टपालाने अथवा napu२२.mhpds@gov.in / satish.supe@gov.in या ई-मेलवर प्राप्त होतील, त्या सूचना शासन विचारात घेईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स.श्री. सुपे

शासनाचे उपसचिव

FOOD, CIVIL SUPPLIES & CONSUMER PROTECTION DEPTT.
Government of Maharashtra
सत्यमेव जयते

C:\USERS\KADAM.UDAY\DESKTOP\NFSA RULES\RULES NFSA NOTE.DOCX17